> स्वत:वर विश्वास ठेवा, कारण आत्म विश्वासाने जग जिंकता येते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | मंगळवार ११ मार्च २०२५ | अंक ९२० पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन म्हणून साजरा होणार, अजितदादांची घोषणा




**महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प ( सोमवार १० मार्च रोजी ) विधीमंडळात सादर करण्यात आला असून राज्यातील नवीन सरकारचा हा पहिलाच अर्थसंकल्प असल्याने या अर्थसंकल्पात अनेक लोकोपयोगी घोषणा करण्यात आल्या असून मराठी भाषेचा गौरवार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात दर्जा दिल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर आता येथून पुढे ३ ऑक्टोबर हा दिवस ङ्गअभिजात मराठी भाषा सन्मान दिनफ म्हणून साजरा होणार अशी घोषणा अर्थ मंत्री अजितदादा यांनी आज अधिवेशनात केली आहे, राज्याचा अर्थसंकल्प २०२५ मांडताना ते बोलत होते. ते पुढे म्हणाले म हाराष्ट्रात आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत आहोत. त्यांनी मराठी भाषेला अभिजात भाषा म्हणून दर्जा मिळवून दिला आहे असे अजितदादा यावेळी म्हणाले. भावफुलांना पायी उधळून आयुष्याचा कापूर जाळुन तुझे सारखे करीन पूजन, गीत तुझे मी आई गाईन शब्दोशब्दी अमृत ओतून: अशा शब्दात अर्थमंत्री अजित पवार यांनी मराठी भाषेचा गौरव करीत मायमराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवून दिल्याबद्दल पंतप्रधानांचे आभार मांडले. आपल्या मायमराठीस केंद्रीय मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ ऑक्टोबर, २०२४ रोजी झालेल्या बैठकीत अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल राज्यातील जनतेच्या आणि जगभरातील मराठी भाषकिंच्यावतीने मी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी महोदयांचे मन:पूर्वक आभार मानतो असेही अजितदादा पवार यावेळी म्हणाले.

## यापुढे ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन

यापुढे दरवर्षी ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा सन्मान दिन, तर ३ ते ९ ऑक्टोबरदरम्यान अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येईल. मराठी भाषा विद्यापीठ, रिद्धपूर येथे अभिजात मराठी भाषेच्या संशोधन व अध्ययनासाठी उच्च दर्जाचे संशोधन केंद्र तसेच अनुवाद अकादमी स्थापित करण्यात येणार आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कार्य करणा-या संस्थांच्या माध्यमातून अभिजात मराठी भाषाविषयक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. मराठी भाषेच्या संशोधनातील उल्लेखनीय कामगिरीसाठी पुरस्कार सुरु करण्यात येणार आहेत अशीही माहीती यावेळी अर्थमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

# माझ्या बाबांचा गुन्हा कोणता ?

## अश्रू ढाळत वैभवीच्या सवालाने गहिवरला मोर्चा

सोलापूर । मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, या मागणीसह, घटनेच्या निषेधार्थ बारामतीत रविवारी सर्वधर्मीय मोर्चा काढण्यात आला. यावेळी देशमुख यांची मुलगी वैभवी हिने रडत रडत केलेल्या भाषणाने बारामतीकर गहिवरले. माझ्या वडिलांचा गुन्हा कोणता?, त्यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली नाही, तर रस्त्याने जाताना धक्का लागला तरी खून होईल, अशी भीती तिने व्यक्त केली. तर पोलिसांनी वेळीच दखल न घेतल्याने ही घटना घडल्याचा आरोप देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला. धनंजय देशमुख म्हणाले, मी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना न्यायाची भीक मागत आहे. २८ मे २०२४ रोजी या पहिल्या घटनेची सुरुवात झाली. अवादा कंपनीच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्याचे अपहरण झाले. कंपनीने २९ तारखेला एफआयआर दाखल केला. परंतु दोघांनी अपहरण केले होते. मात्र, त्यात एकाच व्यक्तीचे नाव आहे. त्याचा कुठेही तपास झाला नाही. आरोपींना कळून चुकले आपले काहीही होत नाही. त्याच अनुषंगाने सूत्रधार वाल्मीक कराह याने सूचना दिल्या. त्याप्रमाणे २९ नोव्हेंबरला खंडणी मागण्यात आली. मात्र, कोणताही गुन्हा दाखल झाला नाही.वैभवी देशमुख हिने वडिलांसाठी न्याय देण्याची मागणी केली. माझ्या वडिलांची हत्या खंडणीतून झाली.



# संतोष देशमुख प्रकरणात माझी मान खाली गेली



बीड । न्युज ममाझ्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी आत्महत्या केल्या. मी लोकसभेला हरले तरीही माझी मान खाली गेली नाही. पण, संतोष देशमुख हत्या प्रकरणात माझी मान खाली गेली आहेफ, अशी खंत राज्याच्या पंकजा मुंडेंनी सविस्तर भूमिका मांडली. संतोष देशमुख हत्या प्रकरणाबद्दल बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, संतोष देशमुख हत्या प्रकरणात आरोपी कोण आहेत, हे न्यायालयातील सुनावणीतून समोर येईल त्याबाबत वातावरण निर्मिती करण्ययात येते. ए जातीला गुन्हेगाराच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. यामुळे सगळा समाज सुन्न झाला आहे. संतोष देशमुख माझा बुथ प्रमुख होता, कार्यकर्ता होता; त्यामुळे मलाही दुख वाटतंय. सत्तेमुळे अहंकार निर्माण होतो. सत्ता असताना कार्यकर्त्यांना सांभाळणे अवघड असते. मी सत्तेवर आहे, जे करायचे ते करा, असे राजकीय नेत्यांकडून सांगितले जाते; हे चुकीचे आहे, असे म्हणत पंकजा मुंडेंना राजकीय नेत्यांच्या भूमिकेवर टीका केली. बीडचे नाव गोपीनाथ मुंडे यांच्याशी जोडले होते, आता बीडचे नाव वाईट अर्थाने घेतले जात आहे. वंजारी समाजाच्या मुलांना वसतिगृहे, शाळांमध्ये वाईट वागणूक दिली

# मागेल त्याला शेत तलाव मंजूर होणार- आ.सुरेश धस



आष्टी । न्युज दि.१५ मार्च २०२५ रोजी आष्टी पंचायत समिती आणि दि.१६ मार्च २०२५ रोजी पाटोदा आणि शिरूर (कासार) येथे आयोजित करण्यात आलेल्या आमसभेमध्ये सर्व घटकातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहावे असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केले आहे. आष्टी येथे निवासस्थानी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते ते म्हणाले सन २०१७ नंतर आष्टी पाटोदा आणि शिरूर (कासार) पंचायत समिती येथे आमसभांचे आयोजन करण्यात आले आहे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मागेल त्या शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत. केंद्र शासनाच्या वतीने पूर्वी ३०ह्न३०ह्न३ या आकारमानाचे ६.५० लक्ष रू.किंमतीचे शेततळे मंजूर होत असत. परंतु त्यामध्ये बदल करण्यात आला असून यानंतर आता २५ह्न२५ह्न३ या आकाराचे ५.०० लक्ष रु. किंमतीचे शेततळे मंजूर करण्यात येणार आहेत.. मग मागणी करण्यात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला शेततळे मंजूर करण्यात येणार आहे पूर्वीच्या शेततळ्यांच्या प्रशासकीय मान्यता बदलून नवीन प्रशासकीय मान्यता घ्यावी लागणार आहे त्याबाबतचे आदेश तीनही पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांना देण्यात आले आहेत त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी शेततळे करून घ्यावेत असे आवाहन करून आमदार सुरेश धस पुढे म्हणाले की पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सर्व योजनेतील घरकुले मंजूर करण्यात आली असून सर्व लाभार्थ्यांना पहिला हप्ता त्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आलेला आहे मात्र आष्टी तालुक्यातील तीन आणि शिरूर (कासार) तालुक्यातील एका ग्रामपंचायत मध्ये काही लाभार्थ्यांना अडचणी निर्माण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे

# मारहाण करणारे लोक माझे नाहीत-आ.क्षीरसागर

## तक्रार आली असेल तर त्यांच्याविरोधात कारवाई करा



बीड : शोरूममध्ये मारहाण करतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला असून यात आ.संदीप क्षीरसागर यांचे कार्यकर्ते असल्याची चर्चा होत होती, याच अनुषंगाने आज माध्यमांशी बोलताना आ.संदीप क्षीरसागर यांनी ते लोक माझे नाहीत, तक्रार आली असेल तर त्यांच्याविरोधात कारवाई करा असे मत व्यक्त केले. तसेच यावेळी बोलताना माध्यमांना सुद्धा विनंती केली की, बीड संदर्भात बातम्या प्रकाशित करताना त्या बातम्यांची सत्यता पडताळून पहावी कारण की बीड जिल्ह्यातील युवा वर्ग इतर जिल्ह्यात राहात असून त्यांना त्याठिकाणी मोठ्या अडचणी येवू लागल्या आहेत. यामुळे माध्यमांनी सुद्धा बीडसंदर्भात बातम्या देताना सत्यता पहावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी माध्यमांना केले.

# खोक्या अद्याप फरार पण मारहाण झालेल्या पिता पुत्रासह चौघांवर ॲट्रॉसिटी अन् पोक्सो दाखल

## हा गुन्हा खरा की,खोटा चर्चेला उधाण; शिरुरकासार तालुक्यात संतापाची लाट

शिरूरमध्ये मारहाण झालेल्या ढाकणे पिता पुत्रासह इतर दोघांविरोधात ॲट्रॉसिटी आणि पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आलाय. शालन भोसले यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, ढाकणे पिता पुत्रावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास उपविभागीय पोलिस अधिकारी करीत आहेत. परंतु हा गुन्हा दाखल झाल्यानंतर खोटा की, खरा अशी चर्चा सुरू झाली. तर खोक्या अद्याप फरार असून तो पोलिसांना सापडलेला नाही. पण त्या आधीच मारहाण झालेल्या पिता-पुत्रासह इतर दोघं असे चार जणांवर गंभीर गुन्हा दाखल झाल्याने शिरुरकासार तालुक्यात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ढाकणे पिता पुत्रावर झालेल्या हल्ल्यामुळे बीडमध्ये संतापाची लाट उसळली. हरणाची शिकार करताना आडवलं म्हणून ढाकणे पिता पुत्राला मारहाण करण्यात आली होती. या प्रकरणात ढाकणे पिता पुत्राने सतीश भोसले उर्फ खोक्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. तसेच त्याला अटक झाली पाहिजे, अशी मागणी ढाकणे कुटुंब आणि गावकऱ्यांनी केली होती. मात्र, आता ढाकणे पिता-पुत्रासह इतर दोघांविरोधात ॲट्रॉसिटीसह पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मआमच्यावर गुन्हा दाखल होऊ शकतोफ, अशी भीती पिता पुत्राने यापूर्वी व्यक्त केली होती. त्यामुळे सतीश भोसलेला अटक न करता, ढाकणे पिता पुत्रावर गुन्हा दाखल झाल्यामुळे अनेकांनी संताप व्यक्त केलाय.

हा गुन्हा खरा की खोटा अशी चर्चा तालुक्यात उघडपणे सुरू आहे.





बीड/महाराष्ट्र
मराठी साहित्य
दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ११ मार्च २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

### स्थानिकांच्या स्वराज्या ला ठेंग

राम मी नसेना का.! राम मी नसेना का? तू मात्र सीता हवीस! कर्तृत्वाला माझ्या डोळ्याआड करण्यास, तू गांधारी व्हावीस! पगार माझा विचारू नकोस, तू मात्र कमावती हवीस! कामावरून आल्यावर, हसतमुख चटकन तू त्या क्षणी गृहिणी व्हावीस!! कुणा कवीच्या काव्यातून पुरुषी स्वभावाचे त्यांच्या अहंकाराने वर्णन एकविसाव्या शतकातही हुबेहूब लागू पडले. घर-संसार सांभाळत बाहेरील सर्व आघाड्यांवर लढून, पुरुषाच्या बरोबरीने नव्हे, तर त्याच्यापेक्षाही दोन पावले पुढेच तिची प्रगती आहे. हे सर्व करीत असताना तिची होणारी शारीरिक, मानसिक ओढाताण कधी विचारात घेतो का? सर्व असूनही नसल्यासारखी ऐहिक सुखाचा डोंगर तिच्यासमोर असताना ती अस्वस्थच. कारण हुकूमशहा, नराधमाने केलेली तिच्या आयुष्याची माती, तुटपुंज्या संसारात, फाटक्या आयुष्यात माता, भगिनी, प्रिया या नात्यांचा गुंता सोडविता सोडविताच स्वतःचा शोध घेऊ मागणारा एक प्रतिनिधिक खंबीर आत्मा!! यावरील काव्यपंक्तीच आपल्याला गंभीर बनवतात. मी सबळ आहे. सक्षम आहे, मला माझ्या स्वतःच्या क्षमतांची ओळख असून, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्राप्त होऊ शकणाऱ्या साऱ्या शक्तींची मला ओळख करून द्यायची आहे. स्त्रीविषयक दृष्टिकोनातून प्रश्नांची उकल करून आपली बाजू पटवून देण्याची हिंमत तिच्यात येऊ घातली. घरात, समाजात आपण एक व्यक्ती नागरिक म्हणून जगले पाहिजे. स्वतःच्या अस्तित्वाचे भान आणि समाजातील दुय्यम स्थान याचा सारासार विचार करून स्वतःला स्वकर्तृत्वाने अव्वल स्थानावर पोहोचण्याचा प्रयत्न म्हणजे सक्षमीकरणाची सुरुवात होय. नारी मे शक्ती अपार है, नारी सृष्टीचा आधार है, नारी का हमेशा सन्मान करो, नारी ही नर के जीवन का सार है. ती पुरुषाला मागे टाकून पुढे जाण्याची स्पर्धा करीत नाही, पण वर्षानुवर्ष पुरुषकेंद्री संस्कृतीने तिच्यावर जो अन्याय केला व जोखंडात बांधले, त्यातून ती मुक्त होऊ इच्छिते. काही प्रमाणात ती मुक्त झाली हे ही तितकेच खरे. या मुक्ततेचे श्रेय काही पुरुषांनाच द्यायला हवेत. आपल्या देशात दोन महात्मे होऊन गेलेत. पहिल्या महात्म्याने जोतिराव पुरुषांनी स्त्रीला शिक्षित केले, तर दुसऱ्या महात्म्याने वर्षानुवर्ष उंबरठ्याच्या आत असलेल्या स्त्रीला उंबरठ्याच्या बाहेर राजकारण आणि समाजकारणात आणले. जीवनाचा नवा मार्ग दाखविला. जीवनाच्या सर्व अंगाचा तिने विकास केला आहे. भातुकलीचा खेळ खेळणारी, घरात आणि वाड्याच्या चौकात सागरगोटे खेळणारी मुलगी आज गावागावातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर जाऊन पोहोचली. मग ती पी. टी. उषा खेळणारी असो की साहित्याच्या क्षेत्रात तर निरक्षर बहिणाबाईपासून लक्ष्मीबाई टिळक, मॅगसेसे पुरस्कार मिळवणारी अरुंधती रॉय असेल. या आणि अनेक स्त्रिया बोलू लागल्या, लिहू लागल्या, संघर्ष करीत करीत स्वतःच्या मुक्तीचा मार्ग शोधू लागल्या. बाईची वेदना बाईलाच कळते म्हणून तिची सुख-दुःखे आणि आनंदही अक्षर वाङ्मयातून पानोपानी येऊ लागल्या. तिचे हे जगणे साहित्यातून भरभरून येऊ लागले. पण ती निर्भय स्वतंत्र वृत्तीची. अनिष्ट चालीरीती विरुद्ध बंड करून उभी आहे. कारण अंधकार होऊन विझायचे नाही. तर एक मशाल होऊन पेटायचे आहे. दुबळे लाचार होऊन जगायचे नाही तर अन्यायाचे उल्लंघन करायचे आहे तिला. आजच्या काळातली जीवनमूल्येच बदललेली आहेत. नवराष्ट्र निर्माणासाठी सुसंस्कृत पिढी निर्माण करणारी ही नव महिला आहे. जिद्द, चिकाटी, मेहनत, प्रामाणिकपणा, चांगुलपणा, सदसदविवेक बुद्धी, निष्कलंक, चारित्र्य इत्यादी मानवी मूल्यांची जोपासना करून ती घराघरातील महिलांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न करत आहे. स्वतः जगा आणि दुसऱ्यांना जगण्यासाठी मदत करा. ही आपली जीवनमूल्य संस्कृती जपली तरच. स्वतः एक बाई म्हणून अभिमान बाळगायला हवा. तरच ती दुसऱ्या बाईला सन्मानाने वागवील. अर्थार्जण करणारी बाई आणि घरात राहणारी गृहिणी यांच्यात भेद होता कामा नये. बाई म्हणून तिचे वेदना एकच आहे. मात्र तिच्या दुःखाचे पदर वेगवेगळे असू शकतील. आज समाजकारणात, राजकारणात स्त्रीचा सहभाग वाढला. तो काही अंशी आरक्षणाने. पण त्याचवेळी असंख्य समस्या ही टोकदार बनल्या आहे. एक ना अनेक प्रकारच्या संघर्षाबरोबरच इकडे कौटुंबिक ताणतणाव कलहासारख्या समस्यांना तिला तोंड द्यावे लागले. या राजकारण समाजकारण आणि कौटुंबिक पातळीवर तिचा अखंड लढा सुरू आहे. यात तिची शारीरिक, मानसिक अवस्था व सतत होणारी अवहेलना न पाहावणारी असते. यावेळेस मला चार ओळी सुचल्या ङ्गङ्घवार नाही तलवार आहे ती समशेरीची धार आहे .स्त्री म्हणजे अबला नाही ती तर धगधगता अंगार आहे!!फ्फ वरील चार ओळी हृदयाला आरपार करणाऱ्या आहेत. आज ८ मार्च जागतिक महिला दिन. दरवर्षी ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिवस म्हणून मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने साजरा करण्यात येतो. या दिवशी म्हणजे ८ मार्च रोजी अमेरिकेतील हजारो कामगार स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी ऐतिहासिक निदर्शने केली होती. प्रत्येकाच्या आयुष्यात महिलांना महत्त्वाचे स्थान आहे. महिलांशिवाय आपले जीवन अपूर्ण आहे. आजचा दिवस प्रत्येक महिलांसाठी सन्मानाचा, अभिमानाचा आणि आनंदाचा दिवस आहे. यादिवशी अनेक ठिकाणी कर्तृत्ववान महिलांचे सत्कार होतात. पुरस्कार दिले जातात, महिलांच्या कार्याची दखल घेत सन्मान केला जातो. शेवटी एवढंच म्हणावसं वाटते, उंबरा ओलांडून घराला मंदिर बनवणारी लक्ष्मी आहे. ती घर संसाराचा गाडा चालविणारी देव्हाऱ्यातील माऊली आहे. तुझ्या प्रयत्नांना मिळू दे यशाची सोनेरी किनार लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे

# नागरिक व महसूल विभागाच्या अत्यंत उपयोगाची : ई चावडी

## नागरिक आता ऑनलाईन वसुलीचा भरणा करू शकणार : तहसीलदार शेळके

महाराष्ट्र शासन व जमाबंदी आयुक्त , पुणे यांनी विकसित केलेल्या ई चावडी या प्रणालीनुसार जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी यांनी वसुली करावी आणि गाव नमुने अद्ययावत करावे अशा स्वरूपाच्या सूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिलेल्या होत्या . त्यास अनुसरून बीड तालुक्यातील कार्यरत मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात सोमवार , दहा मार्च रोजी घेण्यात आले . बीड तालुक्यात २४० गावे , ८८ सजे , १६ मंडळ आहेत . ई-चावडी ही भूमी अभिलेख व्यवस्थापनासाठीची एक प्रगत प्रणाली आहे . तलाठ्यांना ( नवीन नाव ग्राम महसूल अधिकारी ) सक्षम बनवण्यासाठी आणि जमिनीच्या नोंदी अचूक ठेवण्यासाठी ही प्रणाली विकसित केली आहे . या प्रणालीद्वारे शेतकरी आता ऑनलाइन शेतसारा भरू शकतात आणि त्यांना संबंधित नोटीस देखील मिळतात , असे सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणादरम्यान बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके बोलत होते .या प्रशिक्षणाचे नियोजन नायब तहसीलदार सुहास हजारे व अव्वल कारकून महादेव चौरे यांनी केले होते . यावेळी तांत्रिक बाजू तलाठी कृष्णा रत्नपारखे यांनी सांभाळली . प्रशिक्षणासाठी बीड तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी , सर्व ग्राम महसूल अधिकारी उपस्थित होते .

ई-चावडी म्हणजे काय ? :- ही प्रगत भूमी अभिलेख व्यवस्थापन प्रणाली आहे . ई-चावडी ही एक अशी प्रणाली आहे जी भूमी अभिलेखांचे व्यवस्थापन करण्यासाठी वापरली जाते .

शेतसारा भरण्याची सुविधा :- ई - चावडीवर शेतकरी आता ऑनलाइन शेतसारा भरू शकतात . शेतसारा भरण्याची नोटीस देखील आता ई-चावडीवर उपलब्ध आहे . जमिनीच्या व्यवहारांशी संबंधित गुन्हे कमी करण्यासाठी आणि नोंदी अचूक ठेवण्यासाठी ही प्रणाली उपयुक्त आहे . ई - चावडी शेतक-यांसाठी सोयीची ठरणार असून शेतकरी आता घरी बसूनच शेतसारा भरू शकतील . तलाठ्यांना देखील नोंदी अपडेट करणे आणि व्यवस्थापन करणे सोपे होते . प्रणालीमुळे नोंदी अचूक राहतात आणि गैरसमज कमी होतात . जमिनीच्या व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढते . यासंबंधी अधिक माहितीसाठी डिजिटल सातबारा डॉट महाभूमी डॉट जी ओ व्ही डॉट इन ही अधिकृत वेबसाईट आहे .



निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नमूद केल्यानुसार राज्यात गेल्या दशकभरापासून भूमी अभिलेख यंत्रणा कार्यरत असून ई -चावडी प्रणाली अधिक विकसित करण्यात आली आहे . शेतक-यांसाठी जमीन महसूल भरण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन करण्यात येईल , जी जिल्हाभर लागू केली जाणार आहे . ई चावडी प्रणालीमध्ये कोणत्या प्रकारे नोंदी कराव्यात , त्यासाठी कोणती माहिती व कशा प्रकारे अद्ययावत करावी , संगणकीकृत सातबारा व ई फेरफारमध्ये ई चावडीचा उपयोग आदी विषयी यावेळी शेळके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले . यावेळी मंडळ अधिकारी गेवराईचे मंडळ अधिकारी परमेश्वर काळे यांनी ई चावडी प्रणालीचे महत्त्व विषद केले . उपस्थित मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी यांना प्रोजेक्टर द्वारे सर्व गावनमुन्याबाबत व वसुली विषयक माहिती त्यांनी दिली . या प्रणालीमुळे महसूल प्रशासनाचे कामकाज पारदर्शक व गतिमान होण्यास मदत होईल . त्याचबरोबर नागरिकांनाचीही सोय होणार आहे .

राज्यात संगणकिकृत सातबारा प्रकल्प राबविण्यात आला . आता शंभर टक्के ई फेरफार हे ऑनलाईन होत आहे . यातील बारकावे लक्षात आणून देण्यासाठी सविस्तर प्रशिक्षण बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी शनिवारी घेतले . आता त्याची पुढची पायरी म्हणून ई चावडीद्वारे महसूलविषयक आकारणीची माहिती अद्ययावत होत आहे .

ई हक्क प्रणालीमुळे नागरिकांना घरबसल्या वारसा नोंद , ई करार , बोजा चढविणे , बोजा उतरविणे , मयताचे नाव कमी करणे , शेरा कमी करणे , एकत्र कुटुंब नोंद कमी करणे , विश्वस्ताचे नाव कमी करणे ही कामे करता येणार आहेत . हस्तलिखित व संगणकिकृत सातबारामधील तफावत दूर करण्यासाठी ई हक्कद्वारे अर्ज करता येणार आहे . खातेदारांना त्यांची माहिती आनलाईन अद्ययावत करण्याची सोय यामध्ये देण्यात आल्याचे शेळके यांनी सांगितले .

काय असते ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) पद :- तलाठी पदाची निर्मिती कधीची आणि ते पद का महत्त्वाचे आहे ?

ऐतिहासिक पुस्तकांमध्ये ङ्ग पट्टकिन म असा शब्द वापरला जाई . पुढे त्याचे नामकरण ङ्ग पटवारी म झाले . सध्याची अनेक आडनावे इतिहासातील महसूल यंत्रणेशी संबंधित आहेत . आजही भारतीय प्रशासन सेवेत इतिहासातील मौर्य आणि चोल साम्राज्यातील महसूल यंत्रणेचा अभ्यास केला जातो . गावातील जमिनींचा , पिकांचा हिशेब ठेवणारा हिशेबनीस म्हणजे तलाठी . महसूल अधिनियमाच्या १९६६ च्या कायद्यान्वये सध्याची तलाठी ही व्यवस्था काम करते . त्यांच्या कार्यक्षेत्रास साझा किंवा सज्जा असे म्हटले जाते . गावातील इंचनब इंच जमिनीच्या तसेच जलस्रोतांच्या नोंदी ठेवणे हे तलाठी पदाचे मुख्य काम . त्यामुळे हे पद महत्त्वाचे .

महसुली यंत्रणेत अनेक नमुने आहेत . त्यातील ७ क्रमांकाचा नमुना जमिनीचा अधिकार दाखविणारा आणि १२ क्रमांकाचा नमुना पिकांची नोंद सांगणारा आहे . या दोन्ही नमुन्यांच्या तपशिलांचा मिळून तयार होतो ङ्गसातबाराफ . त्याच्या नोंदी घेणारी व्यक्ती म्हणजे तलाठी . खरे तर घेतलेल्या नोंदी मंजूर करण्याचे अधिकार तलाठ्यांकडे नाही , तर ते मंडळ अधिका-यांकडे असतात . पण लोकांचा संपर्क आणि गावातील अनेक प्रकारची कामे करणारा असल्याने तोच सारे काही करतो , असे चित्र दिसते .

गावातील सरकारी जमीन किती , खासगी आणि अतिक्रमित जमिनीच्या नोंदी तलाठ्यास स्वतंत्रपणे घ्याव्या लागतात . यात देवस्थानाच्या जमिनी , इनामी जमिनी , त्यातून मिळणारा महसूल , त्याच्या पावत्या यासह लागवडीखालील जमीन आणि अकृषी म्हणजे नॉन ॲग्रीकल्चर जमीन याचे नमुने येतात . गावातील कोणत्या जमिनीतून उपकर किंवा सेस मिळतो याचा नमुना ठराव बंद या नावाने असतो . यातील १२ क्रमांकाचा नमुना हा पिकांच्या नोंदीचा असतो .

जिल्हाधिका-्यापासून कोतवालापर्यंत महसूल विभागाची व्याप्ती आहे . या महसूल विभागाच्या कामकाजात सुसूत्रता यावी , आधुनिकता यावी या दृष्टीकोनातून वरील प्रकारे ई चावडी , ई पीक पाहणी , ई हक्क , ई फेरफार इत्यादी अनेक आधुनिक प्रणाली , सोयी सुविधा विकसित होत आहेत . विकसित महाराष्ट्राचे हे एक सुखावह चित्र आहे , असे म्हणावे लागेल .

# वित्त व नियोजन मंत्री पालकमंत्री बीड अजितदादांनी ८२ आत्महत्याग्रस्त शेतक्र्यांच्या वारसांना आणि जलजीवन मिशनच्या कामांना निधी द्यावा या मागणीसाठी लक्ष्यवेधी विकासाचे गाजर वाटप आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.१० ) उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार असून बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असुन त्यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रूपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने शासनाला दोन महिन्यांपासून केलेली असुनही अद्याप निधी मिळाला नाही. बीड जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या कामांसाठी निधीचा तुटवडा निर्माण झाला असुन २५० कोटी रुपयांचा निधी शासनाने द्यावा अशी जिल्हा प्रशासनाकडुन शासनाला मागणी करण्यात येऊन केवळ १४ कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असुन तातडीने उर्वरित निधी देण्यात यावा या प्रमुख मागण्यांकडे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांचे लक्ष्य वेधण्यासाठी आज दि.१० सोमवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ङ्ग अजितदादांच्या विकासाचे गाजर वाटपङ्घ लक्ष्यवेधी आंदोलन




करण्यात येऊन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस, सुदाम तांदळे, शिवशर्मा शेलार ,,शेख मुबीन,शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी अशोक येडे, बीड जिल्हा सचिव इंटक सखाराम बेंगडे आदी सहभागी होते.

बीड जिल्ह्यातील ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय अनुदानापासुन वंचित; आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांचा निधी तातडीने देण्यात यावा


बीड जिल्ह्यात १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत २०५ शेतक-्यांनी आत्महत्या केल्याची शासन दरबारी नोंद आहे.यापैकी १०८ कुटुंबियांना मदत देण्यात आली असुन ६३ जणांना मिळणे बाकी आहे. मागच्या वर्षातील ६३ आणि चालु वर्षातील १७ अशी एकुण ८२ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित आहेत. महाराष्ट्र राज्याच्या तिजोरीची चावी हाती असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असुनही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असणे हि अशोभनीय बाब आहे . यासाठी आवश्यक १ कोटी ३२ लाख रुपयांच्या निधीची मागणी जिल्हा प्रशासनाने करून दीड महिना उलटुनही अद्याप निधी मिळाला नाही.बीडच्या विकासाचे व्हिजन दाखवणा-या अजितदादांनी विकासाचे गाजर बीडकरांच्या हाती दिल्याची जनमाणसात भावना असुन तातडीने मदतनिधी द्यावा.

जलजीवन मिशनच्या कामांसाठी २५० कोटी निधीची मागणी असुन केवळ १४ कोटी प्राप्त, उर्वरित निधी द्यावा :- डॉ.गणेश ढवळे

केंद्र सरकारने हर घर जल देण्यासाठी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत प्रतिव्यक्ती ५५ लिटर पाणी देण्याची योजना कार्यरत केली असुन बीड जिल्ह्यात १२२३ गाव आणि वाड्यांची संख्या आहे. पाणीपुरवठा योजना राबविण्यासाठी ११८४ जुन्या आणि आता नव्याने ८१ अशी एकूण १२६५ पाणीपुरवठा कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. यात ० ते २५ टक्के कामे झालेली ८६ तर २५ ते ५० टक्के कामे झालेली १८० तर ५० ते ७५ टक्के कामी झालेली ३८७ कामे तर ७५ ते ९९ टक्के कामे पूर्ण झालेली ३२७ कामे आहेत. यात २४६ कामे पुर्णत्वाकडे असून ३३ योजना ग्रामपंचायतीकडे वर्ग केलेल्या आहेत. मागील ८ महिन्यापासून जलजीवन मिशन साठी निधीचा तुटवडा निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने २५० कोटी रुपये निधीची मागणी शासनाकडे केलेली आहे. मात्र केवळ १४ कोटी रुपये निधी शासनाने उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे पालकमंत्री बीड य अजित दादा पवार यांनी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

# जिजाऊ ब्रिगेड किनवट तालुका कार्यकारिणी जाहीर



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : मराठा सेवा संघ प्रणित जिजाऊ ब्रिगेड किनवट तालुका कार्यकारिणी बैठक जिल्हाध्यक्षा शिवमती कल्पना चव्हाण जिल्हाध्यक्षा शिवमती सुमित्रा वडजकर यांच्या अध्यक्षतेखाली शासकीय विश्रामगृह गोकुंदा येथे पार पडली.तालुका कार्यकारिणी गठीत करून नवनिर्वाचित पदाधिका-्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.प्रारंभी राष्ट्रमाता माँ.साहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जिजाऊ वंदनेने बैठकीला सुरुवात करण्यात आली.तालुका कार्यकारिणीत जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष पदी शिवमती अनिता पवार उपाध्यक्षपदी गोदावरी शिंदे सचिवपदी सविता दिवसे कार्याध्यक्षपदी संध्या पवार सहसचिव अश्विनी पवळे ज्येष्ठ सल्लागार योजना दिवसे कोषाध्यक्षपदी ताराबाई कानवटे सहकोषाध्यक्ष मिनाक्षी केसरे सहकार्याध्यक्ष जयश्री सोमवंशी संघटकपदी निर्मलाबाई सोमवंशी यांची निवड करण्यात आली.यावेळी जिल्हा सचिव (उत्तर) अर्चना होगे जिल्हा सचिव (दक्षिण) वनिता देवसरकर जिल्हा कार्याध्यक्षा सुनिता कल्याणकर,संगीता पवार,कमलबाई चव्हाण,राधा चव्हाण,जिजाबाई सोमवंशी आदींसह मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी उपस्थित होते.

# स्त्रीला संपत्तीपेक्षा सन्मान महत्त्वाचा - सौ. प्राजक्ताताई धस



बीड । प्रतिनिधी स्त्रियांनी सक्षम व्हावे अशी भूमिका शासन आणि प्रशासनाची आहे.प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाने ठसा उमटवावा. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन महिलांनी स्वतःसाठी नवे मार्ग शोधले पाहिजेत असे आवाहन निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले. तर स्त्रीला संपत्तीपेक्षा सन्मान अधिक महत्त्वाचा आहे. परिस्थिती एका दिवसात बदलत नाही, परंतु महिलांनी पुढे येऊन संघर्ष करणे आवश्यक आहे. समाजाचा दृष्टिकोन बदलला तरच खऱ्या अर्थाने समानता प्रस्थापित होईल असे मत सौ. प्राजक्ता सुरेश धस यांनी व्यक्त केले. बीड येथील हॉटेल नीलकमल येथे जागतिक महिला दिनी शनिवार दिनांक ८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्राच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्त्रीरत्न पुरस्कार सोहळा २०२५ चे शानदार वितरण मान्यवरांच्या शुभहस्ते झाल

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
मंगळवार ११ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## रोहितळ येथे आजपासून अखंड हरीनाम सप्ताह व शिवमहापुराण कथेचे आयोजन

गेवराई । प्रतिनिधी संत कुलभूषण महात्मा श्री नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी व जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज निमित्त रोहितळ येथे सोमवार दि.१० मार्च ते १७ मार्च दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक व समस्त ग्रामस्थ मंडळी, रोहितळ यांच्या वतीने करण्यात आले. गेवराई तालुक्यातील रोहितळ येथे स्वानंद सुखनिवासी संत कुलभूषण महात्मा वै.नगदनारायण महाराज यांच्या पुण्यतिथी व जगद्गुरू संत तुकाराम महाराज बीज निमित्ताने महंत शिवाजी महाराज (श्रीक्षेत्र नारायणगड), ह.भ.प महादेव महाराज (श्रीक्षेत्र चाकरवाडी) यांच्या आशिर्वादाने व हभप परमेश्वर म.पवार व भगवान म.गायकवाड यांच्या शुभहस्ते सोमवार दि.१० मार्च ते १७ मार्च दरम्यान अखंड हरीनाम सप्ताह व कथाव्यास ह.भ.प.वर्षाताई काळे यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवमहापुराण कथा होणार आहे.




## मोहिनी चंद्रसेन उबाळे हीने द्वितीय क्रमांक पटकावला



बीड : महिला दिनानिमित्त तुलसी शैक्षणिक समुह आयोजित ५ किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत योध्दा अॅकॅडमीची विद्यार्थी मोहिनी चंद्रसेन उबाळे हीने द्वितीय क्रमांक पटकावला यावेळी तिचा सत्कार करताना मनिषा सपकाळ, मातोश्री कुसुमताई सपकाळ, आशा धांडे, मनिषा राठोड उपस्थित होते.योध्दा अॅकॅडमीचे संचालक कृष्णा पाठक सर व मित्र परिवाराने तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## मराठवाड्यातील सिंचनासाठी भरीव आर्थिक तरतूद केली नाही



काल अर्थमंत्र्यांनी सादर केलेला अर्थसंकल्प म्हणजे फक्त पोकळ घोषणा असून या अर्थसंकल्पातून शेतक-यांच्या तोंडाला पाने पुसणारा हा अर्थसंकल्प आहे.या महायुती सरकारने आपल्या जाहीरनाम्यात दिलेला एकही शब्द पाळला नाही.. शेतक-यांना सरसकट कर्जमाफीची केलेली घोषणा हवेतच राहीली.. बेरोजगार युवक महीला यांच्यासाठीही या अर्थसंकल्पातून काहीच तरतूद केलेली दिसत नाही विशेषता मराठवाड्यातील सिंचनासाठी ही भरीव आर्थिक तरतूद केली नाही.... या महायुती तीघाडी सरकारने जनतेची पुर्णपणे निराशा केलेली असून, सर्व सामान्यांसाठी हा अर्थसंकल्प म्हणजे राजा उदार झाला आणी हाती भोपळा दिला अशी या सरकारची गत झालेली आहे....

शिवसेना जिल्हाप्रमुख बीड परमेश्वर सातपुते सर.( उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना)...!!



**बीड जिल्ह्याचे लोकप्रिय कार्यसम्राट दबंग खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी नेकनूर येथील ह.भ.प.नाना महाराज कदम यांच्या निवासस्थानी भेट देऊन नवीन गृहप्रवेशाच्या शुभेच्छा दिल्या यावेळी कदम परिवाराच्या वतीने बाप्पांचे स्वागत करण्यात आले.**

# जिल्ह्यात जलजीवन योजनेचे अडीचशे कोटी रुपये अडकले टक्केवारीचे दिलेले पैसे अडकल्याची चर्चा-अॅड.अजित देशमुख

बीड । प्रतिनिधी लाडकी बहीण योजना राबवून सरकार परत आणण्याचा प्रयत्न झाला. हा प्रयत्न यशस्वी देखील झाला. मात्र विकास कामे मोठ्या प्रमाणात खोळंबली गेली आहेत. त्यामुळे या योजनेच्या नादात सरकार आणून शासनाने जनतेची फसवणूक केल्याचे स्पष्ट दिसते. बीड जिल्ह्यात केवळ जलजीवन योजनेचे जवळपास अडीचशे कोटी रुपये अडकले असून अनेक सुशिक्षित बेकार अभियंते आणि कंत्राटदार व्याज भरत-भरत परेशान आहेत. त्यामुळे ही एक प्रकारची फसवणूक असल्याचा आरोप जन आंदोलनाचे विश्वस्त अॅड. अजित एम. देशमुख यांनी केला आहे. राज्य शासनाने लाडकी बहीण योजना निवडणुका जवळ आल्यानंतर राबवली. योजना राबवणे हा सरकारचा अधिकार आहे. मात्र योजनेच्या माध्यमातून सरकार आणून जनतेची फसवणूक करणे, हा अधिकार शासनाला नाही. या योजनेच्या नादात एका-एका महिलेने पंचवीस पंचवीस वेळेला लाभ घेतल्याचे निष्पन्न झाले असले, तरी त्यावर कारवाई होत नाही. पुढील निवडणुकीकडे सरकारचा डोळा आहे. योजना राबवण्याचा नादात निकष पाहिले नाहीत. आता दिलेले लाभही कमी होत आहेत. जिल्ह्यातील विकास कामे पूर्णपणे खुळंबली गेली आहेत. तर दुसरीकडे अनेकांनी अनेक कामात दिलेली टक्केवारी अडकून पडल्याने अनेक जण परेशान असल्याची चर्चा जनतेत आहे. सामान्य लोक यात भरडले गेले आहेत. तरी देखील पुढाऱ्यांना याचे देणे घेणे नाही. आठ आठ महिन्यापासून अनेक ठिकाणी जलजिवनची कामे अडकून पडलेली आहेत. त्यांना बिल दिले जात नसल्याच्या तक्रारी होत आहेत. सोलापूर जिल्ह्यात एका कॉन्ट्रॅक्टरने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. अशा बाबी गंभीर आहेत. जलजिवनची अनेक कामे थोड्या प्रमाणात चालू आहेत. मात्र यात गुत्तेदारांचा पैसा अडकून पडला आहे. गुत्तेदारांची कामे कशा पद्धतीने आहेत, हा मुद्दा वेगळा आहे. मात्र अशा प्रकारे त्यांची पिळवणूक करणे, हे कुठल्याही शासन नियमात बसत नाही. त्यामुळे गुत्तेदारांनी देखील शासनाच्या विरोधात पाऊल उचलायला हवे. मात्र तसे होत नाही. एकट्या जलजिवन योजनेचे असे झाले आहे, असे नाही. तर सर्वच विकास कामांना खिळ बसलेली आहे. त्यामुळे नवे सरकार आल्यापासून निधी नसल्याचा बहाणा सांगत विकास कामे खोळंबली आहेत. सामान्य जनतेची यात फसवणूक झालेली आहे. त्यामुळे जनतेने जागे होणे आवश्यक आहे,

# उमरा येथे महादेव मंदीर वर्धापनदिना निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-लोहा : तालुक्यातील उमरा येथील स्व.नारायणराव जैशिंगा पाटील पवळे यांच्या शेतातील जागृत श्री महादेव मंदिराच्या ५-व्या वर्धापनदिना निमित्ताने दि.११-मार्च रोजी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.सकाळी महाआरती होईल व नंतर महाप्रससादाला सुरुवात होईल. तर रात्री ८ वाजता महापूजेला सुरुवात होऊन पहाटे ५ वाजता काकडा आरती होईल.याप्रसंगी श्री.संत बाळगिर महाराज मठ संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य महंत श्री रुद्रगिर महाराज, ह.भ.प.सानिकाताई पवळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.तर महापूजा मांडणी व भजन संध्या सुरू करण्यासाठी दत्त संप्रदायातील जेष्ठ भाविक- भानुदास पाटील सिरसाट, आनंदराव वर्ताळे, विठ्ठलराव पांचाळ, भुजंगराव सिरसाट, शंकरराव पांचाळ, गोपिराव हंबर्डे, तसेच श्री ज्ञानेश्वर भजनी मंडळ उमरा, श्री गुरुमुर्ती भजनी मंडळ आलेगांव, श्री संत बाळगिर महाराज महिला व पुरुष भजनी मंडळ उमरा, व समस्त गावकरी मंडळी उमरा यांचा सहभाग राहणार आहे.तरी भाविक भक्तांनी या कार्यक्रमाचा आवश्य लाभ घ्यावा,असे आवाहन- रघुनाथ जैशिंगा पाटील पवळे, देविदास नारायणराव पाटील पवळे, आनंद पवळे, राम पवळे, परमेश्वर पवळे, व समस्त पवळे परिवार व उमरा ग्रामस्थांनी केले








## जागतिक महिला दिनानिमित धामणदरी येथे आरोग्य शिबिर संपन्न

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड-किनवट : तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र राजगड अंतर्गत असलेल्या अतिदुर्गम भागातील उपकेंद्र धामणदरी येथे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिरात किशोरवयीन व गरोदर मातांची सीबीसी,सिकलसेल व इतर रक्त तपासण्या एच.एल.एल. महालॅब्स द्वारे मोफत करण्यात आल्या. व आयुष्यमान कार्ड काढून देण्यात आले.

दि.८-मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त अतिदुर्गम भागात असलेल्या उपकेंद्र धामणदरी येथे आरोग्य महाशिबीराचे आयोजन केले होते.शिबिराचे उदघाटन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.संगीता देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.या शिबिरात किशोरवयीन मुलींची तपासणी,गरोदर महिलांची तपासणी साने गुरुजी रुग्णालय किनवट येथील स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.भाग्यश्री बेलखोडे यांनी केली.शिबिरात ढइ लरारिळसप अंतर्गत टि.बी.च्या रुग्णांना १०० दिवसाचे फूड बास्केट चे वाटप जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी धामणदरीचे सरपंच परसराम मेश्राम तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गायकवाड वैद्यकिय अधिकारी डॉ. वाघमारे डॉ.आईटवार,शुभम कल्हाळे आदी उपस्थित होते.शिबिर यशस्वितेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र राजगड व धामणदरी उपकेंद्रातील आरोग्य कर्मचा-यांनी परिश्रम घेतल्याने शिबिर यशस्वी झाले.




## विश्व स्कूलचा नारी सन्मान उपक्रम शेताच्या बांधावर जाऊन साजरा



बीड - विश्व स्कूलच्या उक्कडपिंप्री परिसरातील शेतकरी महिलांचा मजागतिक महिला दिनफ निमित्त सन्मान करण्यात आला व पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. स्त्री ही केवळ कुटुंबाची नाही, तर संपूर्ण समाजाची ताकद आहे. तिच्या कर्तृत्वाने प्रत्येक क्षेत्रात नवे मापदंड निर्माण झाले आहेत. आई, मुलगी, बहीण, पत्नी अशा प्रत्येक रूपात ती प्रेम, सहनशीलता आणि सामर्थ्याचा अनोखा संगम आहे. तिच्या सन्मानासाठी, तिच्या प्रगतीसाठी आपण नेहमीच एकत्र उभे राहिले पाहिजे. प्रामुख्याने ग्रामीण भागातील शेतकरी महिलांचा सन्मान करणे व त्यांच्या दैनंदिन कष्टाची दखल समाजासमोर येणे खूप गरजेचे आहे. या उपक्रमात विश्व स्कूलच्या परिसरातील २५ शेतमजूर - शेतकरी महिला सौ.ज्योती सुतार, सौ.नंदाबाई ठेंगल, सौ.यमुनाबाई ठेंगल व ई. त्यांच्या शेतामध्ये जाऊन पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या उपक्रमात विश्व स्कूलच्या वतीने हरी कुंडरे सर,राहुल सुतार,विशाल शिसोदे उपस्थित होते.

# चंपावती शाळेत महिला दिनानिमित्त महिलांच्या कबड्डी स्पर्धा संपन्न

बीड : कोरो एकल महिला संघटनेच्या वतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत एकूण ११ महिला कबड्डी संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेचे निकालः प्रथम स्थानः तुळजाभवानी महिला कबड्डी संघ बीड - ५००० रु रोख रक्कम द्वितीय स्थानः हिरकणी महिला कबड्डी संघ - बीड ३००० रु रोख रक्कम तृतीय स्थानः माऊली महिला कबड्डी संघ- २००० रु रोख रक्कम सर्व विजेता संघांना ट्रॉफी, प्रमाणपत्र, आणि मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहाणे आणि आनंद घेतला. सन्मानित व्यक्तीः महिला दिनाच्या निमित्ताने बीड शहरातील पहिल्या बस चालक, मंजुषा रांजणकर यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन सीमा ओस्तवाल , संपादक वैभव स्वामी, संपादक बालाजी जगतकर, संपादक विनोद शिंदे, बीबी वैद्य आणि कोरो इंडिया च्या विनया घेवडे यांच्या उपस्थितीत झाले. कार्यक्रमाची सुरुवातः महिला कबड्डी स्पर्धेची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून करण्यात आली. समारोपः स्पर्धेचा समारोप डॉ. प्राचार्य सविता शेटे, शुभांगी कुलकर्णी, कोमल मस्के, विनयाताई आणि आत्माराम वाव्हळ यांच्या हस्ते करण्यात आला. आत्माराम वाव्हळ यांनी या स्पर्धेचे दिवसभराचे सूत्रसंचालन केले. विशेष समर्थक व उपस्थित लोकः कोरो इंडिया टीमच्या दीपक निकाळजे, विलास मगरे, निखिल दादा, अनिता खंडागळे इत्यादी सर्व उपस्थित होते. तसेच चंपावती प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापक गंधे सर यांचे ग्राउंड उपलब्ध करून दिल्याबद्दल मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या कार्यक्रमासाठी शिल्पा पंडित, पूजा काळे, आवडताई गायकवाड, अनिता ढोरमारे, छाया गोरे, रुक्मिणी नागापुरे, मंगल कानडे, कौशल्या कळसुले, तारा घोडके, लता सावंत, नौशाद सय्यद आदि संघटना च्या लिडर्स यांनी परिश्रम घेतले.



# अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

## एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्य जनतेच्या जीवनातील आशेचा किरण- अनिलदादा जगताप

बीड, प्रतिनिधी- हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब जी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली नवनिर्वाचित राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी आज शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेबांच्या नेतृत्वात शिवसेनेची समृद्ध वाटचाल सुरु आहे. सर्वसामान्य लोकांच्या हिताचे कार्य शिंदे साहेब करत आहेत यामुळेच शिंदे साहेबांची महाराष्ट्रभरात ताकद वाढविण्यासाठी आम्ही सर्व एकत्रित येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश करत असल्याची भावना किरण चव्हाण यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात व्यक्त केली तर महिला आघाडी मराठवाडा संपर्क प्रमुख संगीता चव्हाण यांनी शिवसेनेत नव्याने प्रवेश करणा-यांचे स्वागत करून जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वात आपण एकजुटीने काम करू असे मनोगत भाषणात सांगितले. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी मनोजराव चव्हाण, केशवदास महाराज, दगडू दादा गायकवाड, वसंतराव जाधव, ढोले बप्पा जाधव, गणेश आनेराव, सचिन चव्हाण, राजेभाऊ दुधाळ, अंकुश दुधाळ, विष्णू लंगोटे, महादेव लांडगे, गणेश जगताप, नामदेव अंकुटे, मुकुंद आनेराव, गौरव वानखेडे, हरी आनेराव सर्व कार्यकर्त्यांचा स्वागत सत्कार करून शिवसेनेत प्रवेश करून घेतले. याप्रसंगी बीड जिल्हा शिवसेना युवासेना महिला आघाडी पदाधिकारी लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



### एकनाथजी शिंदे साहेब सर्वसामान्य जनतेच्या जीवनातील आशेचा किरण- अनिलदादा जगताप

महाराष्ट्राच्या मातीतील कणखर नेतृत्व, सर्वसामान्य जनतेसाठी अहोरात्र झटणारे, गोरगरीब व अनाथांच्या जीवनातील आशेचा किरण, प्रखर इच्छाशक्तीने राज्याच्या प्रगतीसाठी सतत कार्यरत असलेले लोकनेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब अठरा पगड जातीच्या कार्यकर्त्यांना सक्षम आधार आणि ताकद देणारे नेतृत्व आहे. उपमुख्यमंत्री शिंदे साहेब हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांचा रथ पुढे ओढण्याचं काम करत आहेत तर खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब देखील हाच वारसा जपण्यासाठी छोट्यातल्या छोटया कार्यकर्त्यांच्या सोबत राहून त्यांच्या समस्या अडचणी सोडवत आहेत. कार्यकर्ता या नात्याने आम्ही शिंदे साहेबांसोबत पूर्ण ताकदीने काम करतोय आता तुम्ही देखील आमच्याबरोबर एकजुटीने काम करा आणि पक्षाची ताकद वाढवा असे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी उपस्थिती कार्यकर्त्यांना अहवान केले.

## मा. आमदार कैलासजी गोरंट्याल यांनी बीड येथील जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली



बीड - जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री कैलासजी गोरंट्याल साहेब यांनी धोंडीपुरा, बीड येथील द्वारकाधीश भवनमधील जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी मा. श्री विजयजी चौधरी (मा. नगरसेवक, जालना), मा. श्री कपिलजी श्रवणजी भुरीवाले (मा. नगरसेवक, जालना), मा. श्री लाड साहेब आणि द्वारकाधीश मित्र मंडळ, बीड यांची उपस्थिती होती.


या भेटीमध्ये स्थानिक पातळीवरील विकासकामे, नागरिकांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना, तसेच जनतेसाठी सुरू असलेल्या विविध योजनांबाबत चर्चा करण्यात आली. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक बाबींवर सखोल विचारविनिमय झाला.

द्वारकाधीश मित्र मंडळाच्या वतीने मा. आमदार कैलासजी गोरंट्याल साहेबांचे मनःपूर्वक स्वागत करून, त्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन अत्यंत उत्कृष्टरीत्या पार पडले.

## उद्योजिका, लेखिका रूपाली देशपांडे स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित

बीड प्रतिनिधी - दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्कार सोहळा २०२५, शनिवार दिनांक ०८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वा. हॉटेल नीलकमल हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. यात बीड शहरातील प्रसिद्ध उद्योजिका तथा लेखिका रूपाली देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे आणि प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली दैनिक समर्थ राजयोग आणि आश्रय सेवा केंद्र, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्ताने राज्यस्तरीय स्त्री रत्न पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पुरस्कार सोहळ्यात विविध क्षेत्रात आपल्या कर्तबगारीने नावलौकिक मिळविलेल्या महिलांना विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यात शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या विविध व्यवसाय करत आज रिच इव्हेंट्स आणि रिच टूर्स अँड ट्रॅव्हल्स च्या माध्यमातून नावलौकिक मिळविलेल्या उद्योजिका तसेच वृत्तपत्रातून अनेक सामाजिक समस्या आणि प्रश्नांना आपल्या लेखणी द्वारे मांडणाऱ्या लेखिका रूपाली जयंत देशपांडे यांना स्त्री रत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी होते. विशेष अतिथी तथा प्रमुख सत्कारमुर्ती म्हणून प्राजक्ता सुरेश धस होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, उपविभागीय जिल्हाधिकारी कविता जाधव, माजी आमदार अ‍ॅड. उषा दराडे, पोलीस उपाधीक्षक पुजा विठ्ठल पवार, उपविभागीय पोलीस अधीक्षक विश्वांभर गोल्डे, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर, एलसीबी चे पोलीस निरीक्षक उस्मान शेख, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता कृष्णा पानसंबळ, तहसीलदार चंद्रकांत शेळके, प्रभारी गटशिक्षणाधिकारी

# धनंजय मुंडे विरोधात पुरावे असूनही त्यांना सहआरोपी केले जात नाही -मनोज जरांगे



संतोष देशमुख प्रकरणात धनंजय मुंडेविरोधात पुरावे असूनही त्यांना सहआरोपी केले जात नाही. या विषयाला फुल स्टॉप द्या असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पोलिसांना गुप्त आदेश असल्याचा खळबळजनक आरोप मनोज जरांगे यांनी केलाय. इतक्या निर्घृणपणे हत्या घडवून आणणाऱ्या राजकीय गु ंड मित्राला वाचवत असल्याची टीका त्यांनी पुन्हा एकदा केली .धनंजय मुंडे विषारी साप आहे .हा साप तुमच्यासमोर उभा राहणार आहे .त्यावेळी तुम्हाला पश्चातापाचा हात कपाळावर मारावा लागणार आहे .असेही मनोज जरांगे म्हणाले मधनंजय मुंडेसाठी नंबर एकचा आरोपी काम करत होता . त्यांच्या सरकारी बंगल्यावर तशा बैठका झाल्या आहेत .पहिली बैठक त्यांच्या एका कार्यालयावर झाली .त्यामुळे ३०२ कलमांतर्गत धनंजय मुंडे यांना सह आरोपी करायला हवं .फरार आरोपींनी धनंजय मु ंडे यांना फोन केले आहेत .खंडणी मागितल्यानंतर आणि खून झाल्यानंतरसुद्धा हे फोन झाले आहेत .पहिला आरोपी फोन उचलत नव्हता म्हणून इतर आरोपींनी धनंजय मुंडे यांच्याच कानावर फोन करून घातलं आहे अशी लोकांमध्ये चर्चा आहे .धनंजय मुंडे ३०२ मध्ये येतात पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याला फुलस्टॉप दिलेला आहे .फडणवीस स्थानिक पोलिसांना सिग्नल देत नाहीत म्हणून धनंजय मु ंडे वाचलेत .धनंजय मुंडे विषारी साप आहे .हा साप तुमच्यासमोर उभा राहणार आहे .त्यावेळी तुम्हाला पश्चातापाचा हात कपाळावर मारावा लागणार आहे .फअसेही मनोज जरांगे म्हणाले. मचटके दिलेल्या बांधवाला न्याय मिळाला पाहिजे. त्याच्यावर अन्याय झाला, जेवढे चटके देण्यासाठी होते, सर्वांना आरोपी केलं पाहिजे. पोलिसांनी हे लक्षात घ्यावंकुणीही सुटता कामा नये.स्थानिक याने कोणतेही भेदभाव मकार्यालयात आरोपींची केलेल्या पहिल्या बैठकीत खंडणी मागायला जा नाही ऐकलं तर खून करा अशीच बैठक झाली होती .चालवत होता आणि तिथूनच एक नंबरचा आरोपी सगळ्या कार्यकर्त्यांचे काम धनंजय मुंडे च्या वतीने करत होता .दुसरी बैठक कोणत्यातरी हॉटेलमध्ये झाली .आणि त्यानंतर खून झाला .पहिल्यांदा धनंजय मुंडेवर १२० ब लागला पाहिजे . खूनाचा कट रचला आहे, हे तर सिद्ध झालंय .तपास यंत्रणेजवळ पुरावे आहेत .मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फुल स्टॉप दिलाय .यंत्रणेला थांबायला सांगितलं .त्यामुळे तपास यंत्रणा हतबल आहे .फडणवीसांनी गुंड वाचवू नये .ही सरकारची बनवाबनवी सुरू आहे. फडणवीस जाणीवपूर्वक वाचवण्यासाठी प्रयत्न करत होते. धनंजय मुंडे यांच्या कार्यालयातून खंडणी मागितली जात होती. आता सगळं बाहेर येऊ लागलं आहे. धनंजय मुंडे खुनात असल्याचे पुरावे असून फडणवीस त्याला आरोपी होऊ देत नाही. मुंडे सरकारी बंगल्यावर खंडणी बैठक झाली, मुंडे देखील उपस्थित होते, फडणवीस यांच्याकडे सर्व पुरावे असतांना त्याला आरोपी होऊ देत नाही, राजकीय मित्र फडणवीस वाचवत आहे.फअशी टीका जरांगेंनी केली

## बीडच्या रेशीम कोष खरेदी केंद्रात एकाच दिवसात विक्रमी १३ हजार ४८३ किलो रेशीम कोषाची आवक

### - संचालक धनंजय गुंदेकर




बीड (प्रतिनिधी) कृषी उत्पन्न बाजार समिती बीड येथील लोकनेते स्व. विनायकराव मेटे साहेब रेशीम कोश खरेदी केंद्रात काल दिनांक १० मार्च २०२५ रोजी तब्बल १३ टन रेशीम कोषाची आवक झाली आहे. रेशीम कोष खरेदी केंद्राबाबत राज्यभरात विश्वास संपादित झाला असून बारामती, नाशिक, इंदापूर ते थेट विदर्भामधून रेशीम कोष विक्रीसाठी या खरेदी केंद्रात आणला जात असल्याची माहिती संचालक धनंजय गुंदेकर यांनी दिली आहे..

उन्हाळी दिवसांमध्ये आवक ही साधारणतः ५ ते १० टन दरम्यान असते मात्र गेल्या काही दिवसांत बीड येथील मार्केट मध्ये आवक प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे. काल कमाल भाव हा ७३५ रुपये प्रति किलो असा होता. ८ दिवसांच्या आत शेतक-यांचे पेमेंट त्यांच्या खात्यावर अदा केले जाते. रेशीम कोष खरेदी केंद्रातील सेवांबाबत बाजार समिती सभापती श्रीमती सरला कामराज मुळे, उपसभापती श्री शामसुंदर पडुळे, सचिव श्री जाधव, सर्व संचालक मंडळ व रेशीम विभागाचे सर्व अधिकारी कर्मचारी यांचे विशेष लक्ष असते. यामुळेच सध्या रेशीम खरेदी केंद्राबाबत रेशीम उत्पादक शेतक-यांचा विश्वास वाढला असून आवक वाढत चालली असल्याचे संचालक धनंजय गुंदेकर यांनी म्हंटले आहे..

**रेशीम कोष बाजारपेठ, बीड**
बाजारभाव - दि:१०/०३/२०२५
लॉट १४६ (पांढरा कोष)
आवक :- वजन १३ हजार ४८३ किलो १०० ग्राम

**बाजारभाव (प्रति किलो)**

| | |
|---|---|
| कमाल: | ₹ ७३५ |
| किमान: | ₹ २०० |
| सरासरी: | ₹ ६३५ |

## सौ.के.एस.के. महाविद्यालयात पदवी प्रदान कार्यक्रमाचे आयोजन

बीड प्रतिनिधी येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दिनांक १२ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता पदवी प्रमाणपत्र वितरण / दीक्षांत समारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी नवगण शिक्षण संस्थेचे सहसचिव मा. डॉ.योगेश क्षीरसागर व अधिष्ठाता,सामाजिक शास्त्र मा.संजय साळूंके डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर हे दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. शैक्षणिक वर्ष मार्च २०२३ पर्यंत पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या पदवी पात्र विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून आपली पदवी प्रमाणपत्र समारंभपूर्वक हस्तांतरीत करून घ्यावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर यांनी केले आहे.

## पाण्यासाठी अंजनडोह येथील महिलांचा घागर मोर्चा




बीड : उन्हाची तिव्रता वाढत असून याचे चटके आता ग्रामीण भागात बसू लागले आहेत. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात जलजीवनची कामे झाली असली तरीही अजूनही अनेक गावांमध्ये महिलांना पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. धारूर तालुक्यातील अंजनडोह येथील महिलांनी आज पाण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर घागर मोर्चा काढला. यावेळी मोठ्या संख्येने या गावातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## धनंजय मुंडेंसह १० जणांना सहआरोपी करा -दमानिया

### धनंजय मुंडे यांनी वाल्मिक कराड याला कशाप्रकारे सरेंडर करायला लावले,याचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत,



मुंबईः न्याय हा सर्वांसाठी समान असेल तर मिळायला हवा. धनंजय मुंडे यांच्याविरोधात पुरावे उपलब्ध नाहीत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात. पण धनंजय मुंडे यांनी वाल्मिक कराड याला कशाप्रकारे सरेंडर करायला लावले,याचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत, असा सनसनाटी दावा सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी केला. हे प्रकरण अंगावर शेकणार, हे लक्षात येताच धनंजय मुंडे यांना वाल्मिक कराड याला पद्धतशीरपणे जमा केला. धनंजय मुंडे यांचा कार्यकर्ता बालाजी तांदळे हा संतोष देशमुखांच्या कुटुंबीयांनी आम्ही सर्व आरोपींना शोधले, असे सांगत होता. त्याने कोणाला सांगितले की, आरोपींना शोधण्यासाठी आमच्या ६०-७० गाड्या फिरत होत्या. तर धनंजय देशमुख यांना तांदळेने सांगितले की, आमच्या २०० गाड्या आरोपींच्या शोधासाठी फिरत होत्या. मात्र, सीआयडीने दाखल केलेल्या आरोपपत्रात बालाजी तांदळे आणि संशयाच्या भोवऱ्यात असलेल्या पोलीस अधिकाऱ्यांचा समावेश नाही. त्यांचा सहआरोपी केले पाहिजे, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली. त्या सोमवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होत्या. मी धनंजय देशमुख यांच्या नातेवाईकाशी बोलले तेव्हा मला बालाजी तांदळेविषयी समजले. आरोपींना पोलिसांनी नाही तर आम्ही शोधल्याचे बालाजी तांदळे त्यांना म्हणाला होता. त्यामुळे धनंजय मुंडे हे बालाजी तांदळे याच्यावर प्रचंड संतापले होते. धनंजय मुंडे हे बालाजी तांदळेला म्हणाले की, तू जास्त बोलला म्हणून मला त्रास होतोय. धनंजय मु ंडे यांना सगळ्याची कल्पना होती, असे अंजली दमानिया यांनी म्हटले. संतोष देशमुख हत्याप्रकरण आपल्यावर शेकणार हे लक्षात येताच धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांनी आरोपींना शोधायला सुरुवात केली. हे सगळं प्रकरण वाल्मिक कराड याच्यावर शेकावे, आपल्यापर्यंत काही येऊ नये, असा धनंजय मु ंडे यांचा प्रयत्न होता. त्यामुळे माझी मागणी आहे की, या सर्वांना सहआरोपी करा. सीआयडीच्या आरोपपत्रात वाल्मिक कराडला मदत करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांचं नाव नाही. आरोपपत्रातील २०० जणांच्या यादीतून संबंधित पोलीस अधिकारी आणि बालाजी तांदळे यांचे नाव आणि जबाब वगळण्यात आला आहे. यामध्ये एलसीबीचे अधिकारी गीत्ते यांचाही सहभाग असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला.

# बौद्ध विहार आमचेच,म्हणून हिंदू महंतांनी कब्जा सोडावा

## रिपाइंचे जिल्हा कचेरीसमोर महाबोधी विहार मुक्तीसाठी तीव्र निदर्शने




बीड/प्रतिनिधी बिहार राज्यातील बोधगया येथील महाबोधी बौद्ध विहार कायदा १९४९ रद्द करुन महाबोधी बौद्ध विहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. या मागणीसाठी रिपाइंकडून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवार (दि.१०) मार्च रोजी सकाळी ११ वाजता तीव्र निदर्शने करण्यात आली. सदरील निदर्शने रिपाइंचे अध्यक्ष तथा सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

बीड जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, महाबोधी बौद्ध विहारास जागतिक वारसा स्थान म्हणून ओळखले जाते. शाक्य वंशाचे राजकुमार सिद्धार्थ गौतमांना या ठिकाणी पूर्णज्ञान (संबोधी/बुद्धत्व) प्राप्ती होऊन ते सम्यक संबुद्धफ बनले, व ङ्गबुद्धफ म्हणून सर्वत्र ओळखले जाऊ लागले.असे असतांना तेथील बौद्ध विहाराचा ताबा हा हिंदूकडे आहे.त्यामुळे हे बौद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे.यासाठी जगभरातील बौद्ध समाज बिहार येथील बौधगया येथे एकत्रित आलेले आहेत. त्या अनुषंगाने देशात आणि राज्यात रिपाइं अध्यक्ष मंत्री रामदास आठवले, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे यांच्या मार्गदर्शनाखाली निदर्शने केली जात आहेत. बीडमध्ये सोमवारी निदर्शने होवून, त्यानंतर तालुका पातळीवरही निदर्शने केली जाणार आहेत. यावेळी राजू जोगदंड, किसन तांगडे, बापू पवार, अरुण कांबळे, शाहू डोळस, मायाताई मिसळे, रेश्माताई जोगदंड, संगीता जाधव, अरुणा निर्मळ, शोभा गलांडे, अनिता तुरुकमारे, माया वाघमारे, जया शिंदे, माया साबळे, लता भालेराव, अविनाश जोगदंड, सुभाष तांगडे, प्रा.बाळासाहेब गव्हाणे, भैय्या मस्के, धम्मा पारवे, संभाजी गायकवाड, महेंद्र वडमारे, कुमार अरुण, भाऊसाहेब कांबळे, नवनाथ डोळस, भास्कर जावळे, बाजीराव वाघमारे, मनोज बोराडे, रमेश जावळे, गौतम कोरडे, मंगेश पवार, कैलास जोगदंड, अक्षय कोकाटे, संजय हनवते, शाम वीर, अप्पा मिसळे,राम इगवे, समाधान गवळी,विशाल इंगोले, श्रीमंत जाधव, गौतम कांबळे, दीपक कांबळे,बंडू ठोंबरे, महादेव इनकर,विकास ओव्हाळ, ज्ञानोबा माने,जितू धन्वे, यांच्यासह रिपाइं पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सत्याचा इतिहास कोणालाही पुसता येणार नाही!

१८८० च्या दशकात, भारतावर राज्य करणा-या ब्रिटिश सरकारने सर अलेक्झांडर कनिंगहॅम यांच्या मार्गर्शनाखाली महाबोधी विहाराचा जीर्णोद्धार केला. यानंतर काही दिवसांनी इ.स. १८९१ मध्ये श्रीलंकेतील बौद्ध नेते अनागरिक धर्मपाल यांनी या विहाराचा ताबा हिंदूंकडून बौद्धांकडे परत द्यावा या मागणीसाठी एक मोहिम सुरू केली. हिंदू महंतांनी यावर आपेक्ष घेतला पण मोहिम सुरूच ठेवली गेली. इ.स. १९४९ साली या मोहिमेला काही प्रमाणात यश आले; कारण तेव्हा विहाराचा ताबा हिंदू महंतांकडून काढून घेऊन बिहार सरकारकडे देण्यात आला आणि या सरकारने ङ्गमंदिर व्यवस्थापन समितीफ स्थापन केली. या समीतीत ९ सदस्य होते आणि अध्यक्षासह जास्त सभासद हिंदू होते. म्हणजेच या विहाराचा ताबा हिंदूंकडेच होता.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com